## नियमित दिवाणी दावा क्र.३२०/२०१८ मधील निशाणी २५ खालील आदेश

( कडुबाई वि. अर्जुन व इतर)

प्रस्तुतचा अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहिताचे आदेश १ नियम १० व आदेश ६ नियम १७ अन्वये दाव्यामध्ये नव्याने प्रतिवादी क्र.७ ते ९ यांना समाविष्ट करणेसाठी आणि दावा दुरुस्ती करणेकरिता दाखल केलेला आहे.

२. वादीचे अर्जातील कथन असे की, प्रस्तुत दावा हा दावा मिळकतीचे वाटप होवुन मिळण्याकरिता दाखल करण्यात आला असुन दावा प्रलंबित असताना प्रतिवादी क्र.६ याने त्याचे नावावरील सर्व्हे क्र.१४१/आ पैकी ५७ आर क्षेत्र दिनांक ०३/११/२०२० रोजी भारत महादेव तांबरे यास विक्री केले आहे. पुढे भारत महादेव तांबरे याने सदर मिळकत दिनांक १२/०५/२०२२ रोजी हनुमंत तुळशिराम ढाकणे व बाळासाहेब तुळशीराम ढाकणे यांना विक्री केली आहे. त्यामुळे सदरचे खरेदीदार हे प्रस्तुत दाव्यात आवश्यक पक्षकार आहेत. करिता, त्यांना दाव्यामध्ये प्रतिवादी क्र.७ ते ९ म्हणून समाविष्ट करणे आवश्यक आहे. करिता, वादीने वरील इसमांना प्रतिवादी क्र.७ ते ९ म्हणुन समाविष्ट करण्याची आणि प्रतिवादीने नियोजित प्रतिवादीचे हक्कात केलेले खरेदीखता संदर्भात मजकुर दावा दुरुस्तीने दाव्यात समाविष्ट करण्याची विनंती केली आहे. तसेच प्रतिवादी क्र.१ च्या वारसाने प्रतिवादी क्र.१ च्या मृत्युपश्चात नियमित दिवाणी दावा क्र.४७९/२०२२ दाखल करुन त्यामध्ये तडजोड केली आहे. सदर दाव्या संदर्भात देखील वादीस दावा दुरुस्ती करुन मजकुर समाविष्ट करण्याचा आहे. वादीचे मते नियोजित दुरुस्तीमुळे दाव्याच्या मूळ स्वरुपात कोणताही बदल होत नाही. तसेच प्रतिवादींचे हक्कावर कोणतीही बाधा येत नाही. नियोजित दावा दुरुस्ती करणे न्यायाच्या दृष्टीने गजरेचे आहे. करिता, शेवटी वादीने त्यांचा अर्ज मंजुर होण्यास प्रार्थिले आहे.

३.	प्रस्तावित प्रतिवादी क्र. ७ ते ९ यांना नोटीसची बजावणी होवनुही ते प्रकरणात हजर झाले नाही व त्यांचे म्हणणे सादर केले नाही. करिता, प्रस्तुतचा अर्ज त्यांचे विरुध्द एकतर्फा चालविण्यात येतो. तसेच प्रतिवादींनी देखील प्रस्तुत अर्जास म्हणणे सादर केले नाही.

४.	वादीचे अर्जास अनुसरुन दाव्याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, वादीने प्रस्तुतचा दावा हा दावा मिळकतीचे वाटप होवुन मिळण्याकरिता दाखल केलेला आहे. वादीचे अर्जातील कथनानुसार प्रस्तुतचा दावा प्रलंबित असताना प्रतिवादी क्र.६ ने दावा मिळकत सर्व्हे क्र.१४१/आ पैकी ५७ आर क्षेत्र नियोजित प्रतिवादी क्र.७ यास दावा प्रलंबित असताना दिनांक ०३/११/२०२० रोजी विक्री केले आहे. तर नियोजित प्रतिवादी क्र.७ याने सदर मिळकत नियोजित प्रतिवादी क्र.८ व ९ यांना दिनांक १२/०५/२०२२ विक्री केली आहे. त्यामुळे नियोजित प्रतिवादी क्र.७ ते ९ हे प्रस्तुत दाव्यास आवश्यक पक्षकार असून त्यांना दाव्यामध्ये प्रतिवादी क्र.७ ते ९ म्हणून समाविष्ट करुन प्रतिवादी क्र.६ व प्रस्तावित प्रतिवादी क्र.७ ते ९ यांच्यातील झालेल्या दावा मिळकत सर्व्हे क्र.१४१/आ चे खरेदी विक्री व्यवहार संदर्भात मजकुर समाविष्ट करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे प्रतिवादी क्र.१ च्या मृत्युपश्चात त्याचे वारसांनी नियमित दिवाणी दावा क्र.४७९/२०२२ हा दाखल करुन त्यामध्ये तडजोड केली आहे. त्यामुळे त्याअनुषंगे मजकुर देखील दाव्यात समाविष्ट करणे गरजेचे आहे. नियोजित प्रतिवादी क्र.७ ते ९ यांनी वादीने अर्जात दावा मिळकतीचे खरेदीखता संदर्भातील कथन केलेला मजकुर हजर होवुन नाकारलेला नाही. यावरुन, प्रतिवादी क्र.६ ने प्रस्तुतचा दावा प्रलंबित असताना दावा मिळकती मध्ये नियोजित प्रतिवादी क्र.७ ते ९ यांचा हक्क निर्माण झाला आहे. अशा परिस्थितीत प्रस्तुत दाव्यात पारीत होणाऱ्या निकालाचे नियोजित प्रतिवादी क्र.७ ते ९ यांचे हक्कावर फरक पडणार आहे. परिणामी, दाव्याचे स्वरुप पाहता दावा मिळकतीचे खरेदीदार भारत महादेव तांबरे, हनुमंत तुळशिराम ढाकणे व

बाळासाहेब तुळशीराम ढाकणे हे प्रस्तुत दाव्यात बजावणीपात्र हुकुमनामा पारीत करण्याकरिता आवश्यक पक्षकार आहेत. त्यामुळे त्यांना दाव्यात प्रतिवादी म्हणुन सामील करणे गरजेचे आहे.

५. एकंदरीत, वरील विवेचनावरुन नियोजित प्रतिवादी क्र.७ ते ९ हे दाव्यास आवश्यक पक्षकार आहे. तसेच नियोजित दावा दुरुस्ती ही दावा दाखल झाल्यानंतर घडलेल्या घडामोडीवर अवलंबुन आहे. नियोजित दुरुस्तीने दाव्याचे मुळ स्वरुपात कोणताही बदल होत नाही. तसेच नियोजित दुरुस्तीने वादी व प्रतिवादी यांच्यातील वाद कायमचा मिटवण्याकरिता गरजेची आहे. परिणामी, वादीचा अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. करीता, मी पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. वादीचा अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. वादीने अर्जातील मागणीनुसार दावा दुरुस्ती करुन भारत महादेव तांबरे, हनुमंत तुळशिराम ढाकणे व बाळासाहेब तुळशीराम ढाकणे यांना प्रतिवादी क.७ ते ९ म्हणुन दाव्यात सामील करावे. तसेच अर्जातील मागणीनुसार दावा दुरुस्ती करुन दुरुस्ती दाव्याची प्रत अभिलेखावर पुढील तारखेच्या आत दाखल करावी.

३. दावा दुरुस्ती प्रत अभिलेखावर दाखल केल्यानंतर नियोजित प्रतिवादी क्र.७ ते ९ यांना समन्स पाठविण्यात यावे.

४. वादी व प्रतिवादींनी सदर आदेशाची नोंद घ्यावी.

AKSHAY SAMBHAJI JAGTAP

Digitally signed by AKSHAY SAMBHAJI JAGTAP
Date: 2026.03.13 11:50:46 +0530

**(अक्षय सं. जगताप)**

दिनांक १२/०३/२०२६

दिवाणी न्यायाधीश क. स्तर, शिरुरकासार.

"I affirm that the contents of this PDF file are word to word as per original Judgment/order".

| | | |
|---|---|---|
| Dictated on | : | 12/03/2026 |
| Transcribed on | : | --------------- |
| Checked & signed on | : | 12/03/2026 |

SAGAR SOPANRAO AJABE

Digitally signed by SAGAR SOPANRAO AJABE
Date: 2026.03.13 11:51:24 +0530

**[Sagar S. Ajabe]**
Stenographer Grade-3